72/16583
Wednesday,November 08 ,2023
5:43 PM

पावती

Original/Duplicate
नोंदणी क्रं. :39म
Regn.:39M

पावती क्रं.: 18232 दिनांक: 08/11/2023

गावाचे नाव: **नवागाव**
दस्तऐवजाचा अनुक्रमांक: **कलन3-16583-2023**
दस्तऐवजाचा प्रकार : **विकसनकरारनामा**
सादर करणाऱ्याचे नाव: **मे श्रीमान डेव्हलपर्स तर्फे भागीदार मंगेश भाऊराव हरणे**

नोंदणी फी	रु. 30000.00
दस्त हाताळणी फी	रु. 3000.00
पृष्ठांची संख्या: 150	
एकूण:	रु. 33000.00

आपणास मूळ दस्त ,थंबनेल प्रिंट,सूची-२ अंदाजे
6:03 PM ह्या वेळेस मिळेल.

Joint Sub Registrar Kalyan 3
सह.दुय्यम निबंधक वर्ग २ कल्याण क्र.३

बाजार मुल्य: रु.1 /-
मोबदला रु.0/-
भरलेले मुद्रांक शुल्क : रु. 3429500/-

1) देयकाचा प्रकार: DHC रक्कम: रु.2000/-
डीडी/धनादेश/पे ऑर्डर क्रमांक: 1123085009321 दिनांक: 08/11/2023
बँकेचे नाव व पत्ता:
2) देयकाचा प्रकार: DHC रक्कम: रु.1000/-
डीडी/धनादेश/पे ऑर्डर क्रमांक: 1123082509390 दिनांक: 08/11/2023
बँकेचे नाव व पत्ता:
3) देयकाचा प्रकार: eChallan रक्कम: रु.30000/-
डीडी/धनादेश/पे ऑर्डर क्रमांक: MH010777056202324E दिनांक: 08/11/2023
बँकेचे नाव व पत्ता:

नोंदणी फी माफी असल्यास तपशील :-
1) Fee Adjustment : Fee Adjustment (yashada training) code added for keeping tack of adjusted fees

Other Receipt

72/16583
Friday,10 November 2023 7:45 PM

इतर पावती

Original/Duplicate
नोंदणी क्रं. :39म
Regn.:39M

पावती क्रं.: 18358 दिनांक: 10/11/2023

गावाचे नाव: -नवागाव
दस्तऐवजाचा अनुक्रमांक: कलन3-16583-2023
दस्तऐवजाचा प्रकार : विकसनकरारनामा
सादर करणाऱ्याचे नाव: मे श्रीमान डेव्हलपर्स तर्फे भागीदार मंगेश भाऊराव हरणे
वर्णन

दस्त हाताळणी फी	रु. 100.00
पृष्ठांची संख्या: 5	
एकूण:	रु. 100.00

Joint Sub Registrar Kalyan 3

1); देयकाचा प्रकार: DHC रक्कम: रु.100/-
डीडी/धनादेश/पे ऑर्डर क्रमांक: 1123109612158 दिनांक: 10/11/2023
बँकेचे नाव व पत्ता:

11/10/2023

Department of Stamp & Registration, Maharashtra			
Receipt of Document Handling Charges			
PRN	1123085009321	**Date**	08/11/2023
Received from JOINT SUB REGISTRAR KALYAN, Mobile number 9922027473, an amount of Rs.2000/-, towards Document Handling Charges for the Document to be registered(iSARITA) in the Sub Registrar office Joint S.R.Kalyan 3 of the District Thane.			
Payment Details			
Bank Name	SBIN	**Date**	08/11/2023
Bank CIN	10004152023110808795	**REF No.**	331243480939
This is computer generated receipt, hence no signature is required.			

कल्याण – ३

दस्त क्र. ९६५८ | २०२३

९ | ९५५

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR KALYAN-3

Dist Thane

Department of Stamp & Registration, Maharashtra			
Receipt of Document Handling Charges			
PRN	1123082509390	**Date**	08/11/2023
Received from JOINT SUB REGISTRAR KALYAN, Mobile number 9922027473, an amount of Rs.1000/-, towards Document Handling Charges for the Document to be registered (iSARITA) in the Sub Registrar office Joint S.R.Kalyan 3 of the District Thane.			
Payment Details			
Bank Name	SBIN	**Date**	08/11/2023
Bank CIN	10004152023110808863	**REF No.**	331243572410
This is computer generated receipt, hence no signature is required.			

कलन -- ३

दस्त क्र. 9641	२०२३
2	944

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR KALYAN-3

Dist Thane

CHALLAN
MTR Form Number-6

GRN	MH010777056202324E	BARCODE		Date	08/11/2023-13:20:26	Form ID	25.2

Department	Inspector General Of Registration	**Payer Details**	
Type of Payment	Stamp Duty Registration Fee	TAX ID / TAN (If Any)	
		PAN No.(If Applicable)	AEVFS9124A
Office Name	KLN3_KALYAN NO 3 JOINT SUB REGISTRA	Full Name	SHREEMAN DEVELOPERS
Location	THANE		
Year	2023-2024 One Time	Flat/Block No.	OLD SURVEY NO 230, NEW SURVEY NO 3
Account Head Details	**Amount In Rs.**	Premises/Building	
0030063301 Registration Fee	30000.00	Road/Street	VILLAGE NAVAGAON, DOMBIVLI WEST
		Area/Locality	DISTRICT THANE
		Town/City/District	
		PIN	4 2 1 2 0 2
		Remarks (If Any)	SecondPartyName=BLUE BALI CHS LTD~
Total	30,000.00	Amount In Words	Thirty Thousand Rupees Only

Payment Details	IDBI BANK	FOR USE IN RECEIVING BANK			
Cheque-DD Details		Bank CIN	Ref. No.	69103332023110815490	2837583672
Cheque/DD No.		Bank Date	RBI Date	08/11/2023-13:21:36	Not Verified with RBI
Name of Bank		Bank-Branch		IDBI BANK	
Name of Branch		Scroll No. , Date		Not Verified with Scroll	

Department :
Mobile No. : 7387327473

NOTE:- This challan is valid for document to be registered in Sub Registrar office only. Not valid for unregistered document.

सदर चलन केवल दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणी करावयाच्या दस्तासाठी लागु आहे . नोंदणी न करावयाच्या दस्तासाठी सदर चलन लागु नाही .

दस्त क्र. ७६५९ २०२३
३ ७५५

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR KALYAN 3 Dist Thane

Print Date 08-11-2023 01:21:47

सह जिल्हा निबंधक कार्यालयातील सहाय्यक नगर रचनाकार यांनी करावयाच्या मूल्यांकन अहवाल प्रपत्राचा नमुना

एडीजे प्रकरण क्र. ४७१/२०२३
दि. ०६/०९/२०२३.

विषय :—मुल्यांकन अहवाल

मौजे नवागांव ता. कल्याण जि. ठाणे येथील जुना स.नं. २३०, नविन स.नं. ३, क्षेत्र १२६० चौ.मी.

१)	लिहुन देणार	:—	ब्ल्यू बाली को. ऑ. हौ. सो. लि. तर्फे अध्यक्ष श्री. चंद्रकांत सुडकोजी शिगवण व इतर २ (सोसायटी/दुसरे पक्षिय)
२)	लिहून घेणार	:—	मे. श्रीमान डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री. मंगेश भाउराव हरणे व इतर १ (विकासक/प्रथम पक्षिय)
३)	मान्यता देणार	:—	श्री. अरुण रा. महाले व इतर ३५ (तिसरे पक्षिय)
४)	दुय्यम निबंधक कार्यक्षेत्राचे नाव	:—	कल्याण–डोंबिवली महानगरपालिका क्षेत्र
५)	दस्ताचा प्रकार	:—	पुनर्विकास करारनामा
६)	दस्त निष्पादित आहे/नाही	:—	अनिष्पादित
	असल्यास निष्पादनाचा दिनांक	:—	सन २०२३–२४
७)	मिळकतीचा प्रकार	:—	जमीन + बांधकाम
८)	दस्त मिळकतीचे वर्णन	:—	मौजे नवागांव ता. कल्याण जि. ठाणे येथील जुना स.नं. २३०, नविन स.नं. ३, क्षेत्र १२६० चौ.मी.
९)	दस्तातील एकूण मिळकतीचे क्षेत्रफळ	:—	१२६० चौ.मी.

१०) सन २०२३–२४ चे बाजारमुल्य दर तक्त्यामध्ये (झोन न. ४/२१–१८अ) (पान क्र. ३१६), जमिन दर रु. २५९००/– प्रति चौ.मी. व बांधकाम दर रु. २६६२०/– प्रति चौ.मी. इतका नमुद आहे.

सदर पुनर्विकास करारामध्ये सदर जागेवर ब्ल्यू बाली को. ऑ. हौ. सो. लि. मध्ये २ मजल्यांची ए, बी व सी विंग असलेली इमारती असून आहे. सदर इमारतीमध्ये एकूण २४ सभासद आहेत. सदर ३६ सभासद यांचे अस्तित्वातील बांधकाम क्षेत्र १३०८९.२४ चौ.फुट कारपेट क्षेत्र आहे. (पान क्र. २६ अॅनेक्चर अ मधील यादीप्रमाणे)

सदर करारान्वये उभय पक्षांमध्ये ठरलेल्या बाबी खालीलप्रमाणे आहेत.

१) विकासक हे नविन इमारतीमध्ये सोसायटीतील सभासदांच्या अस्तित्वातील कारपेट बांधकाम क्षेत्रापेक्षा ३० टक्के कारपेट म्हणजेच ४०५२.७९ जास्तीचे बांधकाम तसेच अशा एकूण १७१७२.०६ चौ.फुट कारपेट क्षेत्राचे बांधकाम देणार आहेत. (पान क्र. ७ परिच्छेद २ व पान क्र. २६ अॅनेक्चर अ मधील यादीप्रमाण)

२) विकासक हे सोसायटीतील सभासदांना रु. २५,००,०००/– हार्डशिप कॉम्पेनसेशन देणार आहेत. (पान क्र. ७ परिच्छेद क्र. ३)

३) विकासक हे सोसायाटीतील सभासदांना एकूण मंजूर होणा–या पार्किंग पैकी ५० टक्के स्टिल्ट

व ओपन पार्किंग देणार आहेत. (पान क्र. ७ परिच्छेद क्र. २)

४) विकासक हे सोसायटीतील सभासदांना कॉर्पस फंड तसेच बँक गॅरंटी देणार नाहीत (पान क्र. ८ परिच्छेद क्र. ४)

५) विकासक हे सोसायटीतील सभासदांना पर्यायी व्यवस्था, डिपॉझिट रक्कम, शिफ्टिंग चार्जेस तसेच ब्रोकरेज देणार नाहीत (पान क्र. ८ परिच्छेद क्र. ५)

६) बांधकाम पूर्ण करणेचा कालावधी ६० महिने इतका आहे. (पान क्र. ७ परिच्छेद क्र. २)

७) सदरचे बांधकाम हे रेरा अंतर्गत होणार आहे.

८) सदर जागेस उत्तरेस १५ मी. रुंदीचा रस्ता असल्याचे चतुःसिमांमध्ये नमुद आहे.

९) प्रकरणासोबत सादर केलेल्या वास्तुविशारद श्री. रुषीकेश हर्णे, बी. आर. कन्सल्टंट, रजि.नं. सीए/२०१८/१०३८१०,डोंबिवली पश्चिम यांचेकडील दि. २८/०४/२०२३ रोजीच्या दाखल्यामध्ये सदर जागेस १८ मी. रुंदीचा रस्ता असल्याचे नमुद आहे. जागेचे क्षेत्र १२६० चौ. मी. इतके आहे. रस्त्याप्रमाणे १.१० बेसिक एफएसआयनुसार १३८६ चौ.मी., ०.५० प्रिमियम एफएसआयनुसार ६३० चौ.मी., ०.१० टिडीआरनुसार ११३४ चौ.मी. असे एकूण ३१५० चौ.मी. एफएसआय होत आहे. सदर एफएसआयवर ६० टक्के ॲन्सल्लरी एफएसआय १५१२ चौ.मी. व ८० टक्के ॲन्सल्लरी एफएसआय ५०४ चौ.मी. असे एकूण ॲन्सल्लरी एफएसआय २०१६ चौ. मी. इतका होत असून एकूण एफएसआय ५१६६ चौ.मी. इतके अनुज्ञेय होईल.

सबब मुल्यांकन खालीलप्रमाणे परिगणित होत आहे.

(अ) सोसायटीस मिळणा–या मोबदल्याचे मुल्य :–

१) बांधकामाचे मुल्य

= (१७१७२.०६/१०.७६ X १.१०) X २६६२० X १.०५

= १७५५.५१ X २६६२० X १.०५

= रु. ४,९०,६८,५००/–

२) जास्तीच्या क्षेत्राचे मुल्य

= (१७१७२.०६/१०.७६ X १.१० X २५९०० X ३०%

= रु. ३२,२१,१००/–

३) सोसायटी ऑफिसचे मुल्य

= ३५ X २६६२० X १.०५

= रु. १,७८,५००/–

४) विकसन शुल्क :–

= (१७५५.५१ X ०.८० X २५९०० X २.५%) + (१७५५.५१ X ०.२० X २५९०० X ५%) + (३५ X २५९०० X ५%)

= ४०,०५,५०६ + ४,५५,००० + ८७,०००

= ४५,२७,५००/–

५) पार्किंगचे मुल्य

= (३६ X ०.५० X १३.७५ X २६६२० X २५%) + (३६ X ०.५० X ३.०० X २५९००

कलानि ५२.७१
दस्त क्र. ७५५४/२०२३
९५५

X ४०%)

= १६,४७,५०० + ५,५६,५००

= रु. २२,०७,०००/—

६) हार्डशिप कॉम्पेनसेशन = रु. २५,००,०००/—

एकूण (१ ते ८) = ४,९०,६८,५०० + ३२,१९,५०० + ९,७८,५०० + १४,११,५०० + २२,०७,००० + २५,००,०००

= रु. ५,९३,८५,०००/—

<u>(ब) विकसनकर्त्याला मिळणा–या मोबदल्याचे मुल्य :–</u>

= (५१६६ – १७५५.५१) X २५९००

= ३४१०.४९ X २५९००

= रु. ८,८३,३२,०००/—

वजाती :–

१) प्रिमियम एफएसआय क्षेत्र ६३० चौ.मी.

= ६३० X २५९०० X ०.३५

= रु. ५७,१०,९५०/—

२) टिडीआर क्षेत्र ११३४ चौ.मी.

= ११३४ X २५९०० X ०.३०

= रु. ८८,११,१८०/—

३) अॅन्सल्लरी एफएसआय क्षेत्र २०१६ चौ.मी.

= २०१६ X २५९०० X ०.१०

= रु. ५२,२१,४४०/—

एकूण (१ ते ३) = ५७,१०,९५० + ८८,११,१८० + ५२,२१,४४०

= रु. १,९७,४३,५७०/—

कल्याण – ३

दस्त क्र. १६५३ | २०२३

६ | १५५

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR KALYAN-3

सदरची वजाती ही विकासक यांना मिळणा–या हिश्यातून वजा करणे आवश्यक राहील.

= ८,८३,३२,००० – १,९७,४३,५७०

= रु. ६,८५,८८,४३०/— समजा रु. ६,८५,८८,५००/—

म्हणून उपरोक्त अ व ब पैकी जास्तीचे मुल्य बाजारमुल्य = रु. ६,८५,८८,५००/— इतके विचारात घेणे आवश्यक राहील.

ठाणे

दिनांक :– /०९/२०२३

रचना सहायक

CHALLAN
MTR Form Number-6

GRN	MH010547807202324E	BARCODE	Date	03/11/2023-14:43:54	Form ID

Department	Inspector General Of Registration	Payer Details	
Type of Payment	Non-Judicial Stamps Duty on doc Voluntarily brought for Adjud IGR RoM	TAX ID / TAN (If Any)	
		PAN No.(If Applicable)	
Office Name	THD1_JT DIST REGISTRAR THANE URBAN	Full Name	SHREEMAN DEVELOPERS
Location	THANE		
Year	2023-2024 One Time	Flat/Block No. Premises/Building	OLD SURVEY NO 230 NEW SURVEY NO 3
Account Head Details	Amount In Rs.	Road/Street	VILLAGE NAVAGAON DOMBIVLI WEST
0030051701 Amount of Tax	3429500.00	Area/Locality	DISTRICT THANE
		Town/City/District	
		PIN	421202
		Remarks (If Any)	ADJ FILE NO 471/2023
Total	34,29,500.00	Amount In Words	Thirty Four Lakh Twenty Nine Thousand Five Hundred Rupees Only

DEFACED ₹3429500.00 DEFACED

Payment Details	IDBI BANK	FOR USE IN RECEIVING BANK			
Cheque-DD Details		Bank CIN	Ref. No.	09103332023110316736	2636691218
Cheque/DD No.		Bank Date	RBI Date	03/11/2023 14:50:23	Not Verified with RBI
Name of Bank		Bank-Branch		IDBI BANK	
Name of Branch		Scroll No. , Date		100 , 04/11/2023	

Mobile No. : 7387327473

Department ID :
NOTE:- This challan is valid for document to be registered in Sub Registrar office only. Not valid for unregistered document.
सदर चलन केवल दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणी करावयाच्या दस्तासाठी लागू आहे. नोंदणी न करावयाच्या दस्तासाठी सदर चलन लागू नाही.

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR KALYAN - 3 Dist Thane

Challan Defaced Details

Sr. No.	Remarks	Defacement No.	Defacement Date	Userid	Defacement Amount
1		0005572513202324	06/11/2023-17:35:34	IGR108	3429500.00
			Total Defacement Amount		34,29,500.00

Print Date 06-11-2023 05:35:39

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, अभिनिर्णय प्र.क्र. ४७१/२०२३ करिता मे. श्रीमान डेव्हलपर्स यांनी मुद्रांक शुल्क रक्कम रु.३४,२९,५००/- (अक्षरी रु. चौतीस लाख एकोणतीस हजार पाचशे मात्र) GRAS प्रणाली अंतर्गत दिनांक ०३/११/२०२३ रोजी भरलेली असून, त्यांचा GRN NO. MH010547807202324E असा आहे. सदरचा भरणा शासन जमा झाल्याबाबतची खात्री GRAS प्रणाली द्वारे करण्यात आली असून, चलन दि.०६/११/२०२३ रोजी विरुपीत (DEFACE) करण्यात आले आहे.

ठिकाण :- ठाणे

दिनांक :- / /२०२३

(नारायण राजपूत)
मुद्रांक जिल्हाधिकारी
ठाणे (शहर)

कलन — ३
दस्त क्र. ७६५८३ | २०२३
८ ७५५

मुद्रांक जिल्हाधिकारी, ठाणे (शहर) यांचे समोर
महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमा चे अंतर्गत कलम ३१ खालील प्रकरणातील आदेश
अर्जदार :- मे.श्रीमान डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री.मंगेश भाऊराव हरणे

जा.क्र.अभिनिर्णय प्र.क्र. ४७१/२३/९२३५ /२०२३
सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी,
ठाणे (शहर) यांचे कार्यालय, खोली क्र.४०६,४ था माळा,
जिल्हाधिकारी कार्यालय इमारत. आवार, ठाणे (प).
दि.०६/१२/२०२३

प्रस्तावना -

१.संलेखाचा प्रकार :- पुर्नविकास करारनामा
२.संलेख लिहुन देणार :- ब्ल्यू बाली को.ऑ.हौ.सो.लि.तर्फे अध्यक्ष श्री. चंद्रकांत सुडकोजी शिगवण व इतर
३.संलेख लिहुन घेणार :- **मे.श्रीमान डेव्हलपर्स** तर्फे भागीदार श्री.मंगेश भाऊराव हरणे व इतर
४.मान्यता देणार :- श्री.अरुण रा.महाले व इतर
५.मिळकतीचे वर्णन :- जुना सर्व्हे नं. २३०, नविन सर्व्हे नं.३, क्षेत्र १२६० चौ.मी., मौजे- नवांगाव, ता- कल्याण, जि- ठाणे.

२/- प्रस्तुत अर्जदार यांनी महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमा चे अंतर्गत कलम ३१ पोटनियम (१) मधील तरतुदीनुसार मुद्रांक जिल्हाधिकारी, ठाणे (शहर) यांचेकडे दिनांक ०६/०९/२०२३ रोजी अभिनिर्णय अर्ज दाखल केला आहे. अर्जासोबत निष्पादन न केलेले पुर्नविकास करारनामा व प्रतिज्ञापत्रा चे प्रारुप इत्यादी कागदपत्रे सादर केली असून संलेखातील मुद्रांकाबाबत अभिनिर्णय मिळण्यासाठी विनंती केली आहे. तसेच अर्जदार यांनी अभिनिर्णय ऑनलाईन अर्ज दि.६/०८/२०२३ रोजी केला असुन, अभिनिर्णय फी रु.१००/- चलन क्र. MH००६८८९३१४२०२३२४E दि.२१/०८/२०२३ रोजी शासनाच्या लाभात जमा केली आहे.

३/- अर्जदार यांनी प्रस्तुत पुर्नविकास करारनाम्याचे संलेखावर किती मुद्रांक शुल्क आकारता येईल.या प्रयोजनार्थ अर्जासोबत उक्त अधिनियमातील कलम ३१ (२) नुसार खालील कागदपत्रे सादर केली आहेत.
१. महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमा चे अंतर्गत कलम ३१(२) नुसार प्रतिज्ञापत्र.
२. पुर्नविकास करारनामा

कलम - ३
दस्त क्र. ९४५ दि. ०६/१२/२०२३
९ | १५५

४/- विषयांकित दस्तातील विषय वस्तु असलेल्या मुद्रांक शुल्क निर्धारण कामाकरिता पुर्नविकास करारनामामधील मिळकत जुना सर्व्हे नं. २३०, नविन सर्व्हे नं.३, क्षेत्र १२६० चौ.मी., मौजे- नवांगाव, ता- कल्याण, जि- ठाणे येथील आहे.

५/- विषयांकित दस्त हा पुर्नविकास करारनाम्याचा असून, सदर पुर्नविकास करारामध्ये सदर जागेवर ब्ल्यू बाली को.ऑ.हौ.सो.लि. मध्ये २ मजल्याची ए,बी व सी विंग असलेली इमारती असून सदर इमारतीमध्ये एकूण ३६ सभासद आहेत. सदर ३६ सभासद यांचे अस्तित्वातील बांधकाम क्षेत्र ३२७९.२७ चौ.फुट कार्पेट क्षेत्र आहे. (पान क्र. २६ ॲनेक्चर अ मधील यादीप्रमाणे) सदर करारातील अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

१) विकासक हे नवीन इमारतीमध्ये सोसायटीतील सभासदांच्या अस्तित्वातील कारपेट बांधकाम क्षेत्रापेक्षा ३० टक्के कारपेट म्हणजेच ४०५२.७९ जास्तीचे बांधकाम देणार असून एकूण १७१७२.०६ चौ.फुट कारपेट क्षेत्राचे बांधकाम देणार आहेत. (पान क्र. ७ परिच्छेद क्र. २ व पान क्र. २६ ॲनेक्चर अ मधील यादीप्रमाणे)

२) विकासक हे सोसायटीतील सभासंदाना रु.२५,००,०००/- हार्डशिप कॉपेनसेशन आहेत. (पान क्र. ७ परिच्छेद क्र. ३)

३) विकासक सोसायटीतील सभासदांना एकूण मंजूर होणा-या पार्किंगपैकी ५० टक्के स्टिल्ट व ओपन पार्किंग देणार आहेत. (पान क्र. ७ परिच्छेद क्र. २)

४) विकासक हे सोसायटीतील सभासदांना कॉर्पस फंड तसेच बँक गॅरंटी देणार नाहीत. (पान क्र. ८ परिच्छेद क्र. ४)

५) विकासक हे सोसायटीतील सभासदांना पर्यायी व्यवस्था, डिपॉझिट रक्कम, शिफ्टिंग चार्जेस तसेच ब्रोकरेज देणार नाहीत. (पान क्र. ८ परिच्छेद क्र. ५)

६) बांधकाम पूर्ण करणेचा कालावधी ६० महिने इतका आहे. (पान क्र. ७ परिच्छेद क्र. २)

७) सदरचे बांधकाम हे रेरा अंतर्गत होणार आहे.

८) सदर जागेस उत्तरेस १५ मी. रुंदीचा रस्ता असल्याचे चतु:सिमामध्ये नमूद आहे.

९) सहाय्यक नगररचनाकार यांच्या मुल्यांकन अहवालामध्ये पुढीलप्रमाणे नमूद करण्यात आल्या आहेत, प्रकरणासोबत सादर असलेल्या वास्तुविशारद यांचेकडील दि.२८/०४/२०२३ रोजीच्या दाखल्यामध्ये सदर जागेस १८ मी.रुंदीचा रस्ता असल्याचे नमूद आहे. जागेचे क्षेत्र १२६० चौ.मी.इतके आहे. रस्त्याप्रमाणे १.१० बेसिक एफएसआयनुसार १३८६ चौ.मी., ०.५० प्रिमियम एफएसआयनुसार ६३० चौ.मी., ०.९० टिडीआरनुसार ११३४ चौ.मी. असे एकूण ३१५० चौ.मी. एफएसआय होत आहे. सदर एफएसआयवर ६० टक्के ॲन्सल्लरी एफएसआय १५१२ चौ.मी. व ८० टक्के ॲन्सल्लरी एफएसआय ५०४ चौ.मी. असे एकूण ॲन्सल्लरी एफएसआय २०१६ चौ.मी. इतका होत असून एकूण एफएसआय ५१६६ चौ.मी. इतके होत आहे.

६/- विषयांकित दस्तातील मिळकतीचे रचना सहायक यांनी सोसायटीस मिळणा-या मोबदल्याचे मूल्य रक्कम रु.५,९३,८५,०००/- व विकसनकर्त्याला मिळणा-या मोबदल्याचे बाजारमुल्य रक्कम रु.६,८५,८८,५००/- इतके निश्चित केले आहे. सोसायटीस मिळणा-या मोबदल्याचे मूल्य रकमेपेक्षा विकसनकर्त्याला मिळणा-या मोबदल्याचे बाजारमुल्य रक्कम रु.६,८५,८८,५००/- हे जास्त असल्याने, यावर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाचे अनु-५(g-a)(i) अन्वये ५% प्रमाणे रक्कम रु. ३४,२९,४२५/- इतके रुपाचे रक्कम रु. ३४,२९,५००/- इतके मुद्रांक शुल्क वसूल करणे आवश्यक आहे.

कल्याण २

दस्त क्र. १४८३	२०२३
१०	१५५

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR KALYAN-3
सह. दुय्यम निबंधक कल्याण-३
ठाणे
जि. ठाणे
Dist Thane

खालील अटी व शर्ती यांच्या अधिन राहून सदर प्रकरणांत अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहेत.

१. महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम कलम ३२ B व कलम ५३ (१A) च्या अधीन राहून सदरहू आदेश पारीत करणेत येत आहेत.

२. महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम कलम २८ मध्ये नमुद केल्याप्रमाणे मुद्रांक शुल्क /मुल्यांकन आकारणीस पात्र असलेल्या शुल्काच्या रक्कमेवर ज्याचा परिणाम होईल असे प्रतिफल सर्व तथ्य व परिस्थिती याबाबी संलेखात पुर्णपणे व खरेपणाने नमुद केलेल्या आहेत असे अर्जदारांनी प्रतिज्ञापत्राद्वारे खात्री करुन दिली आहे. कलम २८ चे तरतुद संबंधी अर्जदार यांनी अनुपालन न केल्यास कलम-६२अन्वये शास्तीची कार्यवाही करणे आधिन राहून आदेश देत आहे.

३. कलम २८ चे अनुपालन न केल्याचे भविष्यात निर्देशनास आल्यास मुंबई मुद्रांक अधिनियम कलम ४६ व महाराष्ट्र जमिन महसुल संहिता १९६६ अन्वये शास्तीसह मुद्रांक शुल्क वसुल करणेचे आधीन राहून आदेश देणेत येत आहे.

४. दस्तातील नमुद लिखाणाच्या व सोबत सादर केलेल्या कागदपत्राच्या खरेखोटेपणा संदर्भात हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. याबाबतची संपूर्ण जबाबदारी दस्त निष्पादकावर राहील.

५. सदर दस्तातील नमुद मिळकतीच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा अथवा वाद चालु असेल तर त्याची संपूर्ण जबाबदारी दस्त निष्पादकावर राहील.

अंतिम आदेश

वर नमुद केलेल्या बाबीच्या पार्श्वभुमीवर मी खाली स्वाक्षरी करणार मुद्रांक जिल्हाधिकारी, ठाणे शहर प्रश्नाधिन पुर्नविकास करारनाम्याचे संलेखावर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाचे अनु- ५(g-a)(i) अन्वये ५% प्रमाणे एकूण रक्कम रु. ३४,२९,५००/- (अक्षरी रक्कम रु. चौतीस लाख एकोणतीस हजार पाचशे मात्र) इतके मुद्रांक आकारणेचे आदेश देण्यात येत आहेत. सदरील मुद्रांक शुल्क आपणांस मान्य असल्यास हा अंतरीम आदेश प्राप्त झाल्यापासून ६० दिवसांच्या आंत दस्तावर मुद्रांक शुल्काचा भरणा GRAS या प्रणालीव्दारे ऑन-लाईन https://gras.mahakosh.gov.in./ echallan या वेबसाईटवरुन करता येईल. उपरोक्त मुद्रांक शुल्क रक्कम रु. ३४,२९,५००/- लेखाशिर्ष (HEAD) ००३००५१७०१ देय आहे. सदर रक्कम ऑन-लाईन भरल्यानंतर संबंधित पक्षकाराने चलनाची प्रत या कार्यालयात सादर करावी.

ठिकाण :- ठाणे
दिनांक :- / /२०२३

The Seal of the Collector of Stamps Thane (City) मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय (शहर) जिल्हा ठाणे Dist. Thane

(नारायण राजपूत)
मुद्रांक जिल्हाधिकारी,
ठाणे (शहर)

९६५८३	२०२३
११	७५५

प्रत:- १. मे.श्रीमान डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री.मंगेश भाऊराव हरणे
२. सह दुय्यम निबंधक कल्याण क्र. १ ते ५.

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR KALYAN-3 सह दुय्यम निबंधक कल्याण-३ ठाणे वर्ग १ Dist Thane

581

Office of the Collector of Stamp, Thane City

Certificate Under Sec.32 of Maharashtra Stamp Act. 1958

Received Adjudication Fee RS. **100/-** vide e-Challan GRN No. **MH006889314202324E** Dated **21-08-2023**.

Collector of Stamps
Thane City

हे प्रमाणपत्र महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम अन्वये निर्गमित केलेले आहे. परंतु उक्त दस्त नोंदणीसाठी नोंदणी अधिकाऱ्यासमोर दाखल झाल्यास, नोंदणी अधिनियम, १९०८, च्या तरतुदीनुसार नोंदणी अधिकारी दस्त नोंदणीची कार्यवाही करतील.

मुद्रांक जिल्हाधिकारी
Thane City

Case No. **Adj/IGR108/471/2023**

Certificate Number: **CER-THA-ADJ-IGR108-471-2023**

Market Value/Value (if any): **Rs. 68588500**

Consideration Amount (if any): **Rs. 59385000**

Received from **MS SHREEMAN DEVELOPERS** Residing at **102 Siddhivinayak Arcade M P Road Dombivali West Above Canara Bank 421202**. Stamp duty of **Rs. 3429500/- (Rs. Thirty Four Lakh Twenty Nine Thousand Five Hundred only)**. Vide e-Challan GRN No **MH010547807202324E** Dated :- **03-11-2023** The defacement number is **0005572513202324**.

Certified Under Section 32 of the Maharashtra Stamp Act, that the full duty of **Rs. 3429500/- (Rs. Thirty Four Lakh Twenty Nine Thousand Five Hundred only) with which this instrument is chargeable under Article Development agreement of Schedule I of the said Act, has been paid.**

दस्त क्र. 9443 | 2023

This Certificate is subject to the provisions of section 53(A) of the said Act. 22 944

THE SEAL OF THE COLLECTOR OF STAMPS KALYAN Dist Thane

Place: Thane City
Date: 6/11/23

Collector of Stamps
Thane City

6/11/23

GRN. No 92326 Dt. 06/11/2023

ADJ.NO	807	2023
Page/	1	2C



पुर्नविकास करारनामा

सदरचा पुर्नविकास करारनामा आज दि. ०८... माहे नोव्हेंबर..... सन २०२३ रोजी कल्याण येथे खालील पक्षकारांमध्ये लिखित स्वरूपात करण्यात येत आहे.

मे. श्रीमान डेव्हलपर्स, भागीदारी संस्था,
कार्यालय - १०२, पहिला मजला, सिध्दीविनायक आर्केड,
कॅनरा बँकेच्यावर, महात्मा फुले रोड,
डोंबिवली (प.), ता. कल्याण, जि. ठाणे.

तर्फे भागीदार,
१) श्री. मंगेश भाऊराव हरणे, वय ५४ वर्षे, व्यवसाय - व्यापार व बांधकाम,
२) श्री. चंद्रकांत अनंत शिरोडकर, वय ५२ वर्षे, व्यवसाय - व्यापार व बांधकाम. .....
.....पुर्नविकसित करारनामा

कलन – ३

9541/2023	
93	944

लिहुन घेणार (प्रथम पक्षी)
(सदर करारात यापुढे यांचा प्रथम पक्षीय/लिहून घेणार/विकासकर्ता असा उल्लेख केला असून त्यात त्यांचे वालीवारस, प्रतिनिधी, व्यवस्थापक यांचा समावेश आहे)

ह्यांस....
ब्ल्यू वाली सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित,
नोंदणी क्रमांक - टीएनए/केएलएन/एचएसजी/(टीसी)/८६७/८६-८७ सन १९८६-८७.....
पत्ता - नवापाडा, वीर जिजामाता रोड, सुभाष क्रॉस रोड, डोंबिवली (प.),
ता. कल्याण, जि. ठाणे.

तर्फे अध्यक्ष श्री. चंद्रकात सुडकोजी शिगवण, वय ५१ वर्षे.

तर्फे सचिव श्री. विशाल किशन जाटे, वय ३९ वर्षे.

तर्फे खजिनदार श्री. दिनेश रमेश ऐतवडे, वय ४८ वर्षे. .....पुर्नविकसित करारनामा लिहुन देणार (दुसरे पक्षी)
(सदर करारात यापुढे यांचा दुसरे पक्षीय/लिहून देणार/सोसायटी/मालक असा उल्लेख केला असून त्यात त्यांचे वालीवारस, प्रतिनिधी, व्यवस्थापक यांचा समावेश आहे)

आणि

१) अ) अरूण रा. महाले, वय ६४ वर्षे आ) अनुराधा अरूण महाले वय ५८ वर्षे,

२) चंद्रकांत रा. पांचाळ, वय ५८ वर्षे

३) विष्णु सो. राजापकर, वय ७० वर्षे

४) नरेंद्र एस. शेनॉय, वय ६० वर्षे

Signed VK Jate Bhikaaji

ADJ.NO	8609	2023
Page	2	2L

५) अ) अतुल प. चौलकर, वय ४५ वर्षे, आ) पुजा अ. चौलकरए वय ४० वर्षे

६) विशाल कि. जाटे, वय ३९ वर्षे

७) वाबुराज टि. विजयन, वय ४५ वर्षे

८) चंद्रन नांवियार, वय ६५ वर्षे

९) विजय रा. मांडवकर, वय ४३ वर्षे

१०) गोपाळ शेट्टी, वय ६० वर्षे

११) मोहन सु. पवार, वय ३९ वर्षे

१२) समीर चं. आलीम, वय ३८ वर्षे

१३) पुष्पलता वा. वोंटे, वय ५९ वर्षे

१४) अ) वैभव प्र. जावळे, वय ३५ वर्षे, आ) सपना वै. जावळे, वय २९ वर्षे

१५) चंद्रकांत सु. शिगवण, वय ५१ वर्षे

१६) अ) रमेश ज्ञा. ऐतवडे, वय ७५ वर्षे, आ) सरोज र. ऐतवडे, वय ६९ वर्षे

१७) मरीदास एल. वाघमारे, वय ६८ वर्षे

१८) अ) स्मिता वि. दिक्षीत, वय ६७ वर्षे आ) सोनाली सु. रणदिवे, वय ७६ वर्षे

१९) एलीझा ए. लोबो, वय ६४ वर्षे

२०) अ)अनुराधा अरूण महाले, वय ५८ वर्षे, आ)अरूण रा. महाले, वय ६४ वर्षे

कलम – ३
प्रक्रि. ४६५/१९ २०२३
५४ | २५५

२१) समाधान का. खरे, वय ३९ वर्षे

२२) काशिनाथ वा. खरे, वय ६७ वर्षे

२३) किशन रा. जाटे, वय ६३ वर्षे

२४) विशाल कि. जाटे, वय ३९ वर्षे,

२५) [illegible] कलसपुरस्काल, वय ६७ वर्षे,

Dist Thane

VK Tate

ADJNO | 849 | 2023
Page | 3 | 22

२६) रंजना ता. पवार, वय ६८ वर्षे,

२७) अ) कृष्णा तु. सावंत, वय ४६ वर्षे, आ) नंदिनी कृ. सावंत, वय ३९ वर्षे

२८) अ) विजय बा. साळुंके, वय ६७ वर्षे आ) विजया वि. साळुंके, वय ६२ वर्षे

२९) अ) किर्ती वि. बोन्टे, वय ३७ वर्षे आ) पुष्पलता बा. बोन्टे, वय ७९ वर्षे

३०) अ) महेश स. बागवे, वय ७४ वर्षे आ) साईली म. बागवे, वय ७० वर्षे

३१) संजय वि. सुर्वे, वय ६१ वर्षे

३२) अ) रजनी दि. ऐतवडे, वय ४८ वर्षे आ) दिनेश र. ऐतवडे, वय ४८ वर्षे,

३३) शीतल स. गजने, वय ४७ वर्षे

३४) कृष्णा गुं. वारंग, वय ७२ वर्षे

३५) सिताराम कृ. हांदे, वय ७९ वर्षे

३६) संतोष तु. भास्कर, वय ७१ वर्षे

कल्याण – ३
दस्त क्र. १६५८३ | २०२३
१५ | १५५

रहे. व्ह्यू वाली सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित,
पत्ता नवापाडा, वीर जिजामाता रोड,
सुनील हॉर्मस रोड, डोंबिवली (प.),
ता. कल्याण, जि. ठाणे. ..... मान्यता देणार तिसरेपक्षी सभासद
(सदर करारात यापुढे यांचा तिसरे पक्षीय / मान्यता देणार / सभासद असा उल्लेख केला असून त्यात त्यांचे वालीवारस, प्रतिनिधी, व्यवस्थापक यांचा समावेश आहे)

कारणे पुर्नविकसित करारनामा लिहुन देतात व घेतात ते पुढील प्रमाणे

तुकडी जिल्हा ठाणे, पोट तुकडी तालुका कल्याण, तसेच कल्याण डोंबिवली महानगरपालीकेच्या हद्दीतील मौजे नवागाव येथील खालील वर्णनाची मिळकत.

मौजे	जुना सर्व्हे नं.	नविन सर्व्हे नं.	क्षेत्र (चौ. मी.)
मौजे नवागाव	२३०	३	१२६०
व सदर मिळकतीवर असलेली तळमजला २ मजल्याच्या ए, बी व सी विंग अशा ३ विंग असलेली व्ह्यू वाली सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित च्या इमारती ज्यास मालमत्ता क्र. ३०६००३६५६४०० असा आहे अशी इमारतीची मिळकत.			

Vijoon VK Jate

ADJ.NO 809 2023
Page 8 २८

सदर मिळकतीस चतुःसिमा येणेप्रमाणे -

पुर्वेस - सर्व्हे नं. २२९ ची मिळकत.

पश्चिमेस - सर्व्हे नं. ३३४ ची मिळकत.

दक्षिणेस - सर्व्हे नं. ३३४ ची मिळकत.

उत्तरेस - रस्ता. १७ स्क्वे मिटर

या करारात या पुढे सोयीच्या दृष्टीने वरील मिळकतीस म्हणजे जमीन मिळकतीस व इमारतीच्या मिळकतीस **'सदरहु मिळकत'** असे संबोधण्यात आले आहे.

ज्याअर्थी सदरहु मिळकत श्री. नारायण विष्णु म्हात्रे व इतर यांच्या मालकीची व कब्जावहिवाटीची होती. सदरहु मिळकत श्री. नारायण विष्णु म्हात्रे व इतर यांनी दिनांक १८/०६/१९८४ रोजीच्या कराराने मे. प्रणव कंन्स्ट्रक्शन यांस विकसित करण्यासाठी दिली होती. मे. प्रणव कंन्स्ट्रक्शन यांनी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकडुन बांधकाम परवानगी जा. क्र. केएमसी/बीपी/ठाकुर्ली/८४-८७ दिनांक १२/१०/१९८४ अन्वये मंजुर केलेल्या नकाशाप्रमाणे सदरहु मिळकतीवर व्ह्यू वाली को. ऑ. हौ. सो. लि., तळमजला २ मजले ए, बी व सी विंग अशा इमारतीचे बांधकाम केलेले असुन त्यातील सदनिकां महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ च्या तरतुदी अन्वये विविध कराराने निरनिराळ्या सदनिकां खरेदीदारांना विकत दिलेल्या आहेत.

आणि ज्याअर्थी विंग ए, बी व सी च्या सदनिकां धारकांनी महाराष्ट्र संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदी अन्वये नोंदणी क्रमांक - टीएनए/केएलएन/एचएसजी/(टीसी)/८६७/८६-८७ सन १९८६-८७ दिनांक ०४/१२/१९८६ अन्वये व्ह्यू वाली को. ऑ. हौ. सो. लि. या नावाने सोसायटी नोंदणीकृत केली.

आणि ज्याअर्थी कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांनी जा. क्र. कमपा/नरवि/डोंबिवली/८८/६६९ दिनांक १३/०५/१९८८ अन्वये बांधकाम पुर्णतेचा दाखला दिला असुन त्यातील अटी व शर्तींवर वापर परवानगी दिलेली आहे.

आणि ज्याअर्थी सदरहु मिळकतीचे पुर्वीचे विकासक मे. प्रणव कंन्स्ट्रक्शन यांनी सदरहु मिळकतीसबत सोसायटीच्या नावे खरेदीखत करुन दिलेले नसल्यामुळे दुसरेपक्षी यांनी महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री व्यवस्थापने व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये अभिहस्तांतरण अर्ज सक्षम अधिकार तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, ठाणे यांचेकडे दाखल केला व अशा अर्जाची सुनावणी होऊन गुणवत्तेच्या आधारे वरील अधिनियमाअंतर्गत दिनांक २२/०२/२०१३ अन्वये प्राप्त झालेल्या मानिव हस्तांतरण प्रमाणपत्राच्या अनुषंगाने दिनांक १९/०७/२०१४ रोजी सदरहु मिळकतीचे फरोक्तखत दुसरेपक्षी यांच्या लाभांत लिहुन व नोंदवुन देण्यात आले. सदरहु फरोक्तखत दुयम निबंधक वर्ग-१ यांच्या कार्यालयात दिनांक २२/०७/२०१४ रोजी अनुक्रमांक ४५१५/२०१४

अन्वये नोंदविण्यात आले आहे. याप्रमाणे दुसरेपक्षी हे सदरहु मिळकतीचे व त्यावरील असलेल्या ब्ल्यू बाली सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित च्या इमारतींचे मालक झालेले आहेत.

आणि ज्याअर्थी तिसरेपक्षी हे दुसरेपक्षी सोसायटीचे सभासद असल्यामुळे सोसायटीच्या इमारतीचे पुर्नविकासाचे काम या करारातील अटी व शर्तींवर प्रथमपक्षी डेव्हलपर यांना दुसरेपक्षी सोसायटी यांनी देण्याचे मान्य व कबुल केले असल्याने व तशी संमती तिसरेपक्षी यांची असल्याने तिसरेपक्षी यांना प्रस्तुतच्या करारात सामील करण्यात आले आहे.

आणि ज्याअर्थी सदरहु मिळकतीवरील इमारत सुमारे ३७ वर्षे जुनी असल्याने व सदर इमारतीचे बांधकाम जुने व मोडकळीस आल्याने त्याची डागडुजी व दुरूस्ती करणे शक्य नाही म्हणुन दुसरेपक्षी यांच्या सभासदांपैकी म्हणजे तिसरेपक्षी यांच्यापैकी १४ सभासदांनी सदर इमारतीचे पुनर्विकास करण्यासंबंधी अर्ज केले असल्याने दिनांक १३/०३/२०२१ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये ठराव क्र. ६ च्या अनुषंगाने दुसरेपक्षी व त्यांचे सभासद म्हणजे तिसरेपक्षी यांनी संस्थेची इमारत पुर्नविकसित करण्याचे ठरवुन संस्थेची इमारत पुर्नविकसित करण्यासाठी वास्तुविशारद श्री. उदय आर. सातवलेकर यांची नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर दिनांक १७/०४/२०२२ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये ठराव क्र. ४ च्या अनुषंगाने वास्तुविशारद श्री. उदय आर. सातवलेकर यांनी संस्थेच्या इमारतीचे पुर्नविकासाबद्दल सर्व सभासदांना मार्गदर्शन केले व अहवाल समजावुन सांगितला व संस्थेची इमारत पुर्नविकसित करण्यासाठी निविदा मागविण्याचे सर्वानुमत्ते ठरले. त्यानंतर दिनांक २४/०७/२०२२ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये ठराव क्र. २ च्या अनुषंगाने संस्थेची इमारत पुर्नविकसित करण्यासाठी आलेल्या ५ निविदा वाचण्यात आल्या व त्यावर चर्चा करण्यात आल्या.

दुसरेपक्षी यांनी यापुर्वी कायद्यातील तरतुदीचे पालन करून अनिरूध्द कन्सलटंट, आरसीसी कन्सलटंट स्ट्रक्चरल इंजिनिअर यांच्याकडुन दिनांक १७/०८/२०२२ रोजी स्ट्रक्चरल ऑडिट रिपोर्ट प्राप्त केला आहे व स्ट्रक्चरल ऑडिट रिपोर्ट अन्वये इमारतीची सध्यस्थिती लक्षात घेऊन दिलेल्या अहवालानुसार इमारत राहण्यासाठी अयोग्य आहे असा रिपोर्ट देण्यात आलेला असुन सदरहु इमारतीचे पुर्नविकास करणे हे दुसरेपक्षी व तिसरेपक्षी सभासद यांच्या हिताचे असल्याने दुसरेपक्षी यांनी सदरहु मिळकतीवरील सध्या असलेली इमारत पाडुन त्या जागी बहुमजल्याची नविन नियोजित इमारत बांधुन जो कोणी बिल्डर्स व डेव्हलपर्स हा नव्या सदनिकाच्या स्वरूपात दुसरेपक्षी यांच्या सभासदांना म्हणजे तिसरेपक्षी यांना इमारतीत मालकी तत्वावर सदनिका देईल अशा बिल्डर्स आणि डेव्हलपर्स यांना सदरहु मिळकत ही पुर्नविकास करण्याकरिता देण्याचे दुसरेपक्षी यांनी त्यांच्या सभासदांच्या म्हणजे तिसरेपक्षी यांनी ठरविले.

त्यानंतर दिनांक २१/०८/२०२२ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये ठराव क्र. १ च्या अनुषंगाने संस्थेची इमारत पुर्नविकसित करण्यासाठी आलेल्या निविदा पैकी ३ निविदाकारांशी वास्तुविशारद श्री. उदय सातवलेकर यांच्याशी चर्चा करण्यात आली. तसेच, ३ विकासांबरोबर चर्चा केली. सदर चर्चेअंती मौर्या बिल्डर तर्फे भागीदार श्री. मंगेश भाऊराव कदम यांची संस्थेची इमारत पुर्नविकसित करण्यासाठी सर्वानुमत्ते नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर

Shignam VK Jate

ADJ/NO	809	2023
Page/	६	२८

दिनांक २१/०८/२०२२ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये ठराव क्र. ३ च्या अनुषंगाने मौर्या बिल्डर चे भागीदार यांनी दुसरेपक्षी व तिसरेपक्षी यांच्याशी सदरहु इमारत मे. श्रीमान डेव्हलपर्स या नावाने पुर्नविकसित करु इच्छितात अशी चर्चा केल्यावरुन दुसरेपक्षी व त्यांचे सभासदांनी म्हणजे तिसरेपक्षी यांनी सदरहु इमारत पुर्नविकसित करण्यासाठी मे. श्रीमान डेव्हलपर्स या नावाने देण्याचे कबुल केले.

त्यानंतर दिनांक २१/०८/२०२२ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये ठराव क्र. २ च्या अनुषंगाने संस्थेची इमारत पुर्नविकसित करण्यासाठी प्रथमपक्षी, दुसरेपक्षी व तिसरेपक्षी याच्यात काही मुद्दयावर चर्चा करण्यात आली व प्रथमपक्षी व सोसायटीमध्ये झालेला आपसात समजुतीचा अंतिम करार वाचुन दाखविण्यात आला व त्या मुद्दयावर सदरहु संस्थेची इमारत प्रथमपक्षी यांस पुर्नविकसित करण्यासाठी देण्याचे ठरले.

त्यानंतर दिनांक १८/१२/२०२२ रोजीच्या संस्थेची इमारत पुर्नविकसित करण्यासाठी विशेष सर्वसाधारण सभा बोलावली व प्रथमपक्षी यांनी दिलेल्या प्रस्ताव व इतर विकासकांनी दिलेल्या प्रस्तावाअंतर्गत साधक बाधक चर्चा करुन दुसरेपक्षी यांनी सदर सभेमध्ये श्रीमती शुभांगी हितारे, सहकारी अधिकारी श्रेणी - २ संलग्न उपनिबंधक सहकारी संस्था डोंबिवली यांच्या उपस्थितीत सदर सभेत प्रथमपक्षी यांनी दिलेल्या प्रस्तावबाबत चर्चा करण्यात आली व चर्चेअंती दुसरेपक्षी यांच्या सभासदांतर्फे म्हणजे तिसरेपक्षी यांच्यातर्फे ठराव क्र. १ नुसार सदरहु मिळकतीचे पुर्नविकास कार्य प्रथमपक्षी यांच्यामार्फत राबविण्याचे ठरविले. त्यासंबंधी ज्या अटी व शर्ती ठरल्या त्या खालीलप्रमाणे.

१) मिळकतीचे परिशिष्ट - तुकडी जिल्हा ठाणे, पोट तुकडी तालुका कल्याण, तसेच कल्याण डोंबिवली महानगरपालीकेच्या हद्दीतील मौजे नवागाव येथील खालील वर्णनाची मिळकत.

मौजे	जुना सर्वे नं.	नविन सर्वे नं.	क्षेत्र (चौ. मी.)
मौजे नवागाव	२३०	३	१२६०
सदर मिळकतीवर असलेली तळमजला २ मजल्याच्या ए, बी व सी विंग अशा ३ विंग असलेली ब्लू बाली सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित च्या इमारती ज्यास मालमत्ता क्र. १०६००३६५६४०० असा आहे अशी इमारतीची मिळकत.			

सदर मिळकतीस चतुःसिमा येणेप्रमाणे -

पुर्वेस - सर्वे नं. २२९ ची मिळकत.

पश्चिमेस - सर्वे नं. २३४ ची मिळकत

दक्षिणेस - सर्वे नं. ३३४ ची मिळकत.

उत्तरेस - रस्ता १७ रुंद मिटर

ADJNO	849	2023
Page	6	2C

सदरहु मिळकत प्रस्तुतच्या कराराने खालील क्लॉज २ व ३ मध्ये नमूद केलेल्या मोबदल्यात दुसरेपक्षी यांनी प्रथमपक्षी यांस पुर्नविकसित करण्यास दिली असून प्रथमपक्षी यांनी दुसरेपक्षी यांजकडून पुर्नविकसित करणेसाठी घेतलेली आहे.

२) दुसरेपक्षी यांनी त्यांचे सभासद म्हणजे तिसरेपक्षी यांच्या संमतीने प्रथमपक्षी यांस सदर मिळकत विकसीत करण्याचे हक्क व अधिकार देत असल्याने त्याच्या मोबदल्यात प्रथमपक्षी यांनी दुसरेपक्षी यांचे सभासदांना म्हणजे तिसरेपक्षी यांना त्यांच्या ताब्यात असलेल्या सदनिकांच्या चटई क्षेत्राऐवजी ३० टक्के वाढीव चटई क्षेत्राच्या सदनिकां विनामोबदला सोबत जोडलेल्या परिशिष्ट अ प्रमाणे दयावयाचे आहे हे उभयपक्षी यांस मान्य व कबुल आहे.
दुसरेपक्षी यांच्या सभासदांना म्हणजे तिसरेपक्षी यांना वरीलप्रमाणे सदनिकां दयावयाचे कबुल केलेल्या आहेत त्या सदनिकांचा ताबा व सदरहु मिळकतीवर असलेली इमारत प्रथमपक्षी यांच्या ताब्यात दिल्यानंतर ६० महिन्यांच्या कालावधीत दयावयाचे आहे. तसे न झाल्यास प्रथमपक्षी यांना रेरा कायदयाच्या नियमानुसार दंड आकारण्याचा अधिकार दुसरेपक्षी यांस राहील.

परंतु काही नैसर्गिक आपत्ती आल्यास अथवा कायद्यात बदल झाल्यास किंवा कोर्टकचेरी मुळे, इत्यादी कारणास्तव सदरहु मिळकत विकसीत करण्याच्या कामास अडथळा आल्यास त्यामुळे बांधकाम बंद पडल्यास जो पर्यत सदरहु मिळकत विकसीत करण्यास अडथळा आहे तो कालावधी मोजला जाणार नाही व तेवढा कालावधी दुसरेपक्षी व त्यांचे सभासद म्हणजे तिसरेपक्षी हे प्रथमपक्षी यांना वाढवुन देतील.

तसेच कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकडुन मंजुर नकाशाप्रमाणे जेवढया ओपन / स्टिल्ट पार्कींग मंजुर होतील त्या पैकी ५० टक्के ओपन/स्टिल्ट पार्कींग प्रथमपक्षी यांनी दुसरेपक्षी यांस अलॉट करावयाच्या आहेत उभयपक्षी यांच्यात असे ठरले आहे की, दुसरेपक्षी यांच्या हिश्श्यास येणाऱ्या ओपन पार्कींग दुसरेपक्षी यांनी त्यांचे सभासद म्हणजे तिसरेपक्षी यांना अलॉट करावयाच्या आहेत त्याबाबत प्रथमपक्षी हे जबाबदार सहणार नाहीत उभयपक्षी यांच्यात असे ठरले आहे की, ज्या सभादांना पझल/स्टॅक पार्कींग पाहिजे असल्यास त्यासाठी येणारे खर्च त्या संबंधित सभासदांनी प्रथमपक्षी यांस दयावयाचे आहेत. तसेच त्यांनी स्टॅक/पझल पार्कींग पाहिजे असल्यास तशी लेखी सुचना प्रथमपक्षी यांना तिसरेपक्षी सभासद यांच्यावरोबर नविन सदनिकेबाबत करार करतेवेळी दयावयाची आहे. तसेच प्रत्येक सभासदांनी पार्कींगचे देखभाल शुल्क सोसायटीच्या नियमानुसार सोसायटीस दयावे लागेल.

The Collector of Stamps
Thane
Thane
Joint Sub Registrar Kalyan 3
2023
9C | 544

३) दुसरेपक्षी यांनी त्यांचे सभासद म्हणजे तिसरेपक्षी यांच्या संमतीने प्रथमपक्षी यांस सदर मिळकत विकसीत करण्याचे हक्क व अधिकार देत असल्याने प्रथमपक्षी यांनी दुसरेपक्षी यांचे सर्व सभासदांना मिळुन हार्डशिप कॉम्पेनसेशन म्हणुन एकुण रक्कम रु. २५,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. पंचवीस लाख मात्र) दयावयाचे आहे. सदरची हार्डशिप कॉम्पेनसेशनच्या रक्कम रु. २५,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. पंचवीस लाख मात्र) प्रथमपक्षी यांनी दुसरेपक्षी यांच्या सभासदांस म्हणजे तिसरेपक्षी यांस त्याच्या सदनिकांच्या सध्या ताब्यात असलेल्या क्षेत्राप्रमाणे सोबत जोडलेल्या ॲनेक्चर अ प्रमाणे १० टक्के प्रमाणे टी.डी. एस. कपात करून विभागुन दयावयाचे आहे हे दुसरेपक्षी व तिसरेपक्षी यांस मान्य व कबुल आहे.

Shriram VK Jate Bhiwandkar

ADJN/D | 809 | 2023
C | 2C

वरील प्रमाणे पुर्नविकास करण्याबाबतचा मोबदला दुसरेपक्षी यांचे सभासदांस म्हणजे तिसरेपक्षी यांस प्रथमपक्षी यांनी देण्याचा आहे. प्रथमपक्षी यांनी सदर कॉम्पेनसेशनचे धनादेश (PDC) तिसरेपक्षी यांस सदनिकां खाली करतेवेळी दयावयाचे आहे. परंतु सदरचे धनादेश नविन सदनिकेचा ताबा घेतेवेळी तिसरेपक्षी यांनी आपआपल्या खात्यात वटविण्यासाठी जमा करावयाचे असुन त्यावेळी वटविण्यात येईल. ह्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रकारे मोबदला दुसरेपक्षी व त्यांचे सभासदांनी म्हणजे तिसरेपक्षी यांनी मागावयाचा नाही हे दुसरेपक्षी व त्यांचे सभासद म्हणजे तिसरेपक्षी यांना मान्य व कबुल आहे.

४) प्रथमपक्षी यांच्यातर्फे दुसरेपक्षी व तिसरेपक्षी यांस कोणत्याही प्रकारचा कॉर्पस फंड देण्यात येणार नाही. तसेच प्रथमपक्षी यांच्यातर्फे दुसरेपक्षी व तिसरेपक्षी यांस बँक गॅरंटी देणार नाहीत हे उभयपक्षी यांस मान्य व कबुल आहे.

५) प्रथमपक्षी यांच्यातर्फे दुसरेपक्षी यांच्या सभासदांस म्हणजे तिसरेपक्षी यांस पर्यायी व्यवस्था, डिपॉझीट रक्कम, तसेच जाणे येणे चे दोन्ही शिफ्टींग चार्जेस, तसेच ब्रोकरेज देण्यात येणार नाही.

६) दुसरेपक्षी यांचे ज्या सभासदांनी म्हणजे तिसरेपक्षी यांनी त्यांचे सदनिकेकरिता बँकेतुन वा कोणत्याही वित्तीय संस्थेकडुन कर्ज काढले असल्यास ते कर्ज पुर्णपणे फेड करुन बँकेचा ना हरकत दाखला प्रथमपक्षी यांस देणे दुसरेपक्षी यांचे सभासदांवर म्हणजे तिसरेपक्षी यांच्यावर बंधनकारक राहील किंवा बँकेचे ना हरकत प्रमाणपत्र देणे बंधनकारक राहील.

७) कल्याण डोंबिवली महानगरपालीकेकडून बांधकाम परवानगी मिळाल्यानंतर व तशी लेखी सुचना प्रथमपक्षी यांनी दुसरेपक्षी यांना दिल्यानंतर व नविन इमारतीमध्ये सभासदांना देण्यात येणाऱ्या सदनिकांबाबत दुयम निबंधक यांच्या कार्यालयात करार नोंदणी करुन प्रथमपक्षी यांनी दिल्यानंतर दुसरेपक्षी यांचे सभासदांचे म्हणजे तिसरेपक्षी यांच्या सध्या ताब्यात असलेल्या सदनिकांचा ताबा प्रथमपक्षी यांना दयावयाचा आहे त्यानंतर सदर भुखंडावरील इमारत जमीन दोस्त करण्यास सुरुवात करण्यात येईल. तसेच दुसरेपक्षी यांच्या सभासदांनी म्हणजे तिसरेपक्षी यांनी त्यांची पर्यायी राहण्याची सोय स्वतः करावयाची आहे.

८) सदर प्रथमपक्षी यांनी सदरहु पुर्नविकास प्रकल्प हा रियल इस्टेट रेग्युलेशन ॲक्ट २०१६ (रेरा अधिनियम) अधिन राहुन नोंदणी करुन घ्यावयाचा आहे. सदर नोंदणी पत्राची एक प्रत प्रथमपक्षी यांनी दुसरेपक्षी यांस सोसायटीस तावोडतोब दयावयाची आहे. तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे अन्वये करावयाचा आहे.

९) सदरहु मिळकतीवर प्रथमपक्षी हे कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या मंजुर नकाशाप्रमाणे बांधकाम करतील. प्रथमपक्षी हे महानगरपालिकेकडुन नकाशा मंजुर करुन घेण्यापुर्वी नकाशा सदर सोसायटीस व सभासदांस सादर करतील त्यांच्या मान्यतेने नकाशा मंजुर करुन घेतील. तसेच प्रथमपक्षी यांनी दुसरेपक्षी यांचे सभासदांना म्हणजे तिसरेपक्षी यांना वरीलप्रमाणे सदनिकां दयावयाच्या कबुल केल्या आहेत त्या सदनिकांचे निव्वळ कारपेट क्षेत्र हे रेरा कायदयाअंतर्गत देतील हे प्रथमपक्षी यांस मान्य व कबुल आहे.

VK Jate

ADJUNG 489 2023
Page 9 2C

१०) दुसरेपक्षी यांचे सभासदांना म्हणजे तिसरेपक्षी यांना देण्यात येणाऱ्या सदनिकां तिसऱ्या मजल्यापासुन ते नवव्या मजल्यापर्यंत दयावयाचे आहे व त्या सदनिकां तिसरेपक्षी यांस राखीव ठेवण्याच्या आहेत. उरलेल्या सर्व मजल्यावरील सदनिकां प्रथमपक्षी यांस विकण्याचा अधिकार आहे.

तिसरेपक्षी यांच्यामध्ये सदनिकांची वाटणी खालीलप्रमाणे केली जाईल.

अ) जुन्या इमारतीत तिसरेपक्षी यांच्याकडे तळमजल्यावर ज्यांच्याकडे सदनिका आहेत त्यांना २ व ४ मजल्यावर सदनिकां देण्यात येतील.

आ) जुन्या इमारतीत तिसरेपक्षी यांच्याकडे पहिल्या मजल्यावर ज्यांच्याकडे सदनिका आहेत त्यांना ५ व ६ मजल्यावर सदनिकां देण्यात येतील.

आ) जुन्या इमारतीत तिसरेपक्षी यांच्याकडे दुसऱ्या मजल्यावर ज्यांच्याकडे सदनिका आहेत त्यांना ७ ते ९ मजल्यावर सदनिकां देण्यात येतील.

सध्याच्या जुन्या इमारतीतील रोड साईडच्या व ज्या सभासदांच्या सध्या अस्तित्वात असलेल्या इमारतीत दोन सदनिका आहेत त्या सदनिकां धारकांना उपलब्धता पाहुन अलॉट करताना त्यांच्या पसंतीच्या मजल्यावाबत सुट देण्यात येईल. सर्व सभासदांना वरीलप्रमाणे वाटणी करण्यात येईल.

११) इमारतीचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर महानगरपालिकेकडुन बांधकाम पुर्णत्वेचा दाखला मिळाल्यानंतर प्रथमपक्षी यांनी तिसरेपक्षी यांस नविन इमारतीत सदनिकांचा ताबा देण्यासाठी सुचना दिल्यानंतर १ महिन्याच्या आत तिसरेपक्षी यांनी ठरलेल्या प्रमाणे नविन इमारतीतील सदनिकेचा ताबा सर्व देणे-घेणेच्या हिशोबाअंती घ्यावयाचा आहे. जरी तिसरेपक्षी यांनी वरील मुदतीत नविन इमारतीतील सदनिकेचा ताबा घेतला नाहीत तरी सुध्दा तिसरेपक्षी यांस नविन इमारतीतील सदनिकांचे मेंटेनन्स चार्जेस व प्रॉपर्टी टॅक्स देणे अधनकारी राहील हे तिसरेपक्षी यांस मान्य व कबुल आहे.

१२) प्रथमपक्षी हे दुसरेपक्षी यांचे सभासदांना म्हणजे तिसरेपक्षी यांना देण्यात येणाऱ्या सदनिकांमध्ये ज्या सुखसुविधा (ॲमेनिटीज) देणार आहेत त्या सोबत परिशिष्ट व म्हणुन जोडलेल्या आहेत.

दस्त क्रमांक 2648/2023
29/11/2023

१३) दुसरेपक्षी यांच्या सभासदांना म्हणजे तिसरेपक्षी यांना देय असलेल्या नविन सदनिकांचा नोंदणीकृत करारनामा करतेवेळी ३० टक्के वाढीव विनामोबदला मिळणाऱ्या क्षेत्रफळाची स्टॅम्प डयुटी, रजि. फीस, लिगल फी, जी. एस. टी., इत्यादी प्रथमपक्षी यांनी दयावयाची आहे.

१४) प्रथमपक्षी यांनी दुसरेपक्षी यांचे सभासदांस म्हणजे तिसरेपक्षी यांस वरीलप्रमाणे सदनिकां दयावयाच्या कबुल केल्या आहेत. मात्र तिसरेपक्षी यांच्यापैकी कोणालाही वाढीव क्षेत्राच्या सदनिकां हव्या असल्यास त्या प्रथमपक्षी यांनी दयावयाच्या कबुल केल्या आहेत. मात्र त्या वाढीव क्षेत्रापैकी पहिल्या २५ चौ. फुट (कारपेट) क्षेत्राकरिता त्या सभासदांनी प्रथमपक्षी यांस मोबदला म्हणुन प्रति चौ. फुट कारपेट रक्कम रू. ९,२६२/- (अक्षरी रक्कम रू. नऊ हजार दोनशे बासष्ट मात्र) प्रमाणे होणारी रक्कम दयावयाची आहे. तसेच

THE JOINT SUB-REGISTRAR KALYAN-3 Dist Thane

VK Jate

ADJ.NO	809	2023
Page/	90	2C

चौ. फुट (कारपेट) पेक्षा वाढीव क्षेत्राची त्या सभासदांनी प्रथमपक्षी यांस मोबदला म्हणुन प्रति चौ. फुट कारपेट रक्कम रू. १०,६८८/- (अक्षरी रक्कम रू. दहा हजार सहाशे अठ्याऐंशी मात्र) प्रमाणे होणारी रक्कम दयावयाची आहे. तिसरेपक्षी यांनी वाढीव क्षेत्राची रक्कम प्रथमपक्षी यांना दयावयाची आहे. ज्या सभासदास वाढीव क्षेत्राची सदनिका पाहिजे असल्यास त्या सदनिकेची आगाऊ रक्कम किती दयावयाची आहे ती रक्कम उभयपक्षी यांनी आपसात समतीने ठरविण्याचे आहे व उर्वरित रक्कम इमारतीच्या प्रगतीप्रमाणे दयावयाची आहे. वाढीव एरियाची पुर्ण किंमत तिसरेपक्षी यांनी प्रथमपक्षी यांस दिल्यानंतरच नविन इमारतीत सदनिकेचा ताबा प्रथमपक्षी यांनी तिसरेपक्षी यांस दयावयाचा आहे.

उभयपक्षी यांच्यात असे ठरले आहे की, या करारान्वये दुसरेपक्षी यांच्या सभासदांना दयावयाच्या कबुल केलेल्या आहेत मात्र सदरहु भुखंडावर बांधकाम करण्यासाठी मंजुर आराखड्याप्रमाणे तेवढया क्षेत्राचे सदनिकां मंजुर आराखड्यामध्ये मंजुर न झाल्यास व त्या सदनिकांचे क्षेत्र २७ चौ. फुट (कारपेट) पेक्षा कमी भरल्यास त्या कमी क्षेत्राची प्रति चौ. फुट कारपेट रक्कम रू. ९,२६२/- (अक्षरी रक्कम रू. नऊ हजार दोनशे बासष्ट मात्र) प्रमाणे होणारी रक्कम प्रथमपक्षी यांनी त्या सभासदांस दयावयाची आहे आणि सदर क्षेत्र २७ चौ. फुट (कारपेट) पेक्षा जास्त भरल्यास त्या जास्त क्षेत्राची प्रति चौ. फुट कारपेट रक्कम रू. १०,६८८/- (अक्षरी रक्कम रू. दहा हजार सहाशे अठ्याऐंशी मात्र) प्रमाणे होणारी प्रथमपक्षी यांनी तिसरेपक्षीयांस दयावयाची आहे.

१७) तिसरेपक्षी यांना देण्यात येणाऱ्या नविन सदनिकांची उंची ही कमीत कमी ९.५ फुट (सदनिकेतील लादीच्या पृष्ठ भागापासुन ते सदनिकेतील छताच्या दर्शनी भाग पर्यत) उंच असावी तसेच देण्यात येणाऱ्या बांधकाम करण्यासाठी चांगल्या दर्जाचे बांधकाम साहीत्य चांगल्या प्रतिचे वापर करणे आवश्यक राहील.

१८) प्रथमपक्षी यांनी नविन इमारतीसाठी नविन एक बोअरवेल करुन बोअरवेलचे पाणी प्रत्येक सदनिकेतील टॉयलेट मध्ये स्वःखर्चाने देण्याचे मान्य व कबुल केले आहे.

१९) प्रथमपक्षी यांनी सदरहु भुखंडावर पुर्नविकासाचे बांधकाम कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने मंजुर केलेल्या बांधकाम आराखड्याप्रमाणे तंतोतंत व बांधकाम परवानगीच्या अटी व शर्तींच्या अधिन राहुन करावयाचे आहे.

२०) प्रथमपक्षी हे बांधणार असलेल्या नविन इमारतीतील दुसरेपक्षी यांचे सभासदास तिसरेपक्षी यांस देणे असलेल्या सदनिकां सोडून इतर सदनिकां अन्य गिऱ्हाईकांस विकण्याचा अधिकार प्रथमपक्षी यांस राहील व त्यातुन येणाऱ्या रक्कमेवर दुसरेपक्षी व त्यांचे सभासदांचा म्हणजे तिसरेपक्षी यांचा कोणताही हक्क अधिकार राहणार नाही व त्यांना सदर सोसायटी मध्ये नविन सभासदांकडुन कोणतीही प्रिमीयम किंवा पगडी न आकारता सभासद करणे दुसरेपक्षी यांच्यावर बंधनकारक राहील मात्र नविन सभासदांनी सोसायटीच्या नियमाप्रमाणे सर्व कागदपत्रे सोसायटीकडे सादर करावयाचे आहे.

VK Jain

ADJ/NO	8109	2023
Page/	99	2C

१९) दुसरेपक्षी यांचे सभासदांची नावे व त्याच्या सध्या ताब्यात असलेली सदनिका व त्याचे क्षेत्र सोबत जोडलेल्या ॲनेक्चर अ मध्ये दिलेले आहे व तसेच तिसरेपक्षी यांच्या सध्या ताब्यात असलेल्या सदनिकेचे क्षेत्र सोबत जोडलेल्या ॲनेक्चर अ मध्ये दिलेले आहे.

